International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# छत्रपती शाहू महाराजांचे प्लेग निवारण व समकालीन प्रस्तुतता

डॉ.एस.ए.मोरे
एम.एच.शिंदे महाविद्यालय,तिसंगी
*Corresponding Author*- डॉ.एस.ए.मोरे
Email- samoresir7@gmail.com

**प्रस्तावना**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थांचे भाग्यविधाते, महाराजांनी राबविलेल्या अनेक कल्याणकारी, महत्त्वकांक्षी व प्रजाहित दक्ष धोरणामुळे कोल्हापूरचा भाग्योदय झाला. दळणवळणाची अपुरी साधने, अपुरे वैद्यकीय क्षेत्र, संशोधनाची कमतरता व समाजातील नागरिकांचे अज्ञान अशा बिकट परिस्थितीत देखील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी प्लेग व दुष्काळ परिस्थितीचा समूळ नायनाट करण्याच्या दृष्टिकोनातून केलेले कार्य महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय आहे. आजच्या समाजाला प्रेरणादायी ठरावे असेच कार्य आहे. शिवाय आपण आज covid-19 यासारख्या महामारीला सामोरे जात आहोत.अशा परिस्थितीत आज आपण ज्या योजना राबविल्या त्याच छत्रपती शाहू महाराजांनी 120 वर्षांपूर्वी राबविल्या होत्या. म्हणून मी या संशोधन पेपर मध्ये शाहू महाराजांचे प्लेग निवारण समकालीन प्रस्तुतता या माध्यमातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

1) छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कोणत्या नैसर्गिक आपत्ती आल्या त्यांचा मागोवा घेणे.
2) प्लेग सारख्या महामारीच्या कालखंडात प्लेग पासून संसर्ग होऊ नये म्हणून शाहू महाराजांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती घेणे.
3) छत्रपती शाहू महाराजांनी प्लेग सारख्या परिस्थितीत जनतेला कशा प्रकारे आधार दिला याचा अभ्यास करणे.

## संशोधनाचे महत्त्व

आज आपण कोरोना चा सामना करीत असताना शाहू महाराजांच्या आपत्ती व्यवस्थापन तंत्राचे आठवण येते. 120 वर्षांपूर्वी वैद्यकीय सुविधा नसतानाही शाहू महाराजांनी प्लेगच्या साथीचा सामना केला .या साथीचा सामना करण्यासाठी केवळ प्रजेला कामाला लावलं नाही तर स्वतः सगळ्या नियोजनावर लक्ष ठेवले होते. त्यावेळी अंधश्रद्धेचा प्रचंड पगडा होता त्यामुळे वैज्ञानिक माहिती देणे सोपे नव्हते . आज कोरोना बाबतीत झालं तसंच प्लेग बाबत झालं होतं तरी त्यांनी स्वतः लस टोचून घेऊन जनतेपुढे आदर्श ठेवला होता .त्यामुळे कोल्हापूर संस्थानात प्लेग पसरू शकला नव्हता. शाहू महाराजांची प्लेग निवारण कार्यपद्धत विलक्षण होती. त्यामुळेच या प्लेग निवारणाच्या बाबतचे शाहू महाराजांचे धोरण व कार्य महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म 26 जून 1874 व शाहू महाराज 17 मार्च 1884 रोजी शाहू छत्रपती म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आले. 2 एप्रिल 1894 रोजी त्यांना कोल्हापूर संस्थानाच्या कारभाराची अधिकार प्राप्ती झाली. कोल्हापूरचे प्रजाजन ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होते ती गोष्ट घडून आली सर्व मराठी मुलखास आनंद वाटावा अशी ही घटना होती. म्हणूनच लोकमान्य टिळकांनी या घटनेचे वर्णन करताना केसरीतील आपल्या अभिनंदनपर अग्रलेखात म्हटले आहे 'हा दिवस सर्व महाराष्ट्रीयनास आनंदाचा तर खराच त्यातूनही कोल्हापूरच्या प्रजेस हा एक कपिलाषष्टीचा अपूर्व योग होता.[१]खरोखरच टिळकांनी केलेल्या वर्णनाचा पुढे प्रत्यय आलेला दिसून येतो त्यांनी केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आणि उपयोजनातून कोल्हापूरच्या प्रजेला त्यांनी कसा दिलास दिला याचा प्रत्यय येतो.

## कोल्हापूर संस्थानातील प्लेग आणि शाहू महाराजांचे धोरण

गेली दोन वर्षे आपण कोरोना सारख्या माहा भयंकर साथीच्या रोगाला सामोरे जात आहोत. लाखो

लोकांनी आपले प्राण गमावले आहेत.कोरोनावर मात करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरूच आहेत आज आपण अलगीकरण, विलगीकरण,क्वारंटाईन, पॉझिटिव्ह ,निगेटिव्ह या संकल्पना ऐकत आहोत यासारखीच परिस्थिती छत्रपती शाहू महाराजांच्या काळात प्लेगमुळे निर्माण झाली. लाखो लोक प्लेगमुळे मृत्यू पावत होते.परंतु छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्लेगचा शिरगाव होऊ नये म्हणून या सर्व गोष्टींचा त्यावेळी वापर केलेला दिसून येतो. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात फार कमी प्रमाणात प्लेगचे बळी गेल्याचे दिसून येते. तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी प्लेग निवारण्यासाठी नेमके कोणते उपाय केले हे पाहणे निश्चितच उद्बोधक ठरेल.

छत्रपती शाहू महाराजांनी लोकांना शास्त्रीय ज्ञान मिळावे म्हणून लोकप्रबोधनाची एक मोहीमच हाती घेतलेली आपल्याला दिसून येते.प्रजेच्या हिताच्या रक्षणाची काळजी लागून राहिलेले महाराज या सुमारास एका मित्राला लिहिलेल्या पत्रात म्हणतात ,'पन्हाळा राजवाड्यात मी फक्त झोपतो इतर सारा वेळ मी कार्यालयात काम करण्यातच व्यग्र असतो सकाळच्या वेळी मी शहरात प्लेगची कामे कशी चालली आहेत या वर देखरेख ठेवतो.[२] सातारा, सांगली, मिरज संस्थानात प्लेगची साथ पसरली होती ती कोल्हापुरात येऊ नये व पसरू नये म्हणून शाहू महाराजांनी 1897 साली प्रतिबंधक उपाययोजना केली .आपल्या नगरपालिकेच्या अखत्यारीत असलेले शहर सफाई खाते दिवानाच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली देण्याची तजवीज करण्यात आली .[३]पुण्यात रॅंड आणि त्याच्या हाताखालील सैनिकांनी घरात घुसून निर्जंतुकीच्या नावाखाली स्त्रियांच्या अंगावर हात टाकून त्यांची विटंबना केली म्हणून तसा प्रकार कोल्हापुरात होऊ नये म्हणून कोल्हापूर दरबाराने प्रतिबंधक उपायांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना 23 ऑक्टोबर 1997 रोजी पुढील प्रमाणे तंबी दिली होती ,'सदरच्या कामाकरिता घरात शिरलेल्या लोकांनीं स्त्रियांचे मर्यादेस व ज्यांचे त्याचे धर्मास बाधा न येईल असे वर्तन ठेवले पाहिजे म्हणून त्यास ताकीद देण्यात येत आहे.[४] यातून प्लेगच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा अन्याय अथवा अत्याचार होणार नाही याची दक्षता छत्रपती शाहू महाराजांनी घेतल्याचे दिसून येते.

प्लेगचा आजार मुंबई-पुणे वगैरे ठिकाणी चालू आहे त्या आजाराचा प्रवेश करवीर संस्थानात न होण्याकरिता सावधगिरी कशी घ्यावी याबाबत त्यांनी 1897 रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.[५] एखाद्या ठिकाणी प्लेगचा संसर्ग झाला असेल तर त्या भागातील व्यक्ती दुसऱ्या गावात अथवा शहरात गेल्यास त्या ठिकाणीही प्लेगचा फैलाव होऊ शकतो हे जाणून गावाच्या वेशीवर, कोल्हापूरच्या वेशीवर ठिकठिकाणी क्वारंटाईन कॅम्प त्यावेळी छत्रपती शाहूमहाराजांनी उभारले होते.साथीने दूषित झालेल्या भागातून आलेल्या लोकांनी शिरोळ क्वारंटाईन सेंटरमध्ये वीस दिवस राहिले पाहिजे त्याबाबत त्यांनी 30 सप्टेंबर 1898 मध्ये एक सरकारी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.[६] या जाहीरनाम्यातून प्लेग रोगाचा प्रसार होऊ नये याची दक्षता शाहू महाराजांनी घेतल्याचे पहावयास मिळते. प्लेगचा जंतू नायनाट व्हावा म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी लोकांना आपली घरे खाली करून झोपड्या बांधून शेतात राहण्यास सांगितलेचे दिसून येते.कोल्हापूर शहरातील घरेदारे व चीज वस्तू निर्जंतुक करण्यासंबंधी जे काही नियम सांगितले ते नियम त्याने 9 डिसेंबर 1898 रोजीच्या जाहीरनाम्यात स्पष्ट केल्याचे दिसून येतात. घरे कशी स्वच्छ ठेवावी, धान्य वाळवून कशी ठेवावेत, कपडे ,लोखंडी सामान, लाकडी साहित्य कसे निर्जंतुक करावे, मेलेल्या उंदराची कशी विल्हेवाट लावावी याबाबतीत अत्यंत बारकाव्यानिशी शाहूमहाराजांनी नियम घातलेली दिसून येतात.[७] एकूणच प्लेगचा प्रसार होऊ नये याबाबत शाहूमहाराज किती दक्ष होते याची जाणीव वरील जाहीरनाम्यातून दिसून येते.

यात्रा, उत्सव, जत्रा यांच्यामुळे साथीचा रोगाचा प्रसार होऊ शकतो म्हणून त्यांनी 7 जानेवारी 18 99 रोजी दिवान सबनीसानी हुकूम जारी करून संस्थानाच्या प्लेगग्रस्त भागातील ठिकाणी भरणाऱ्या देवांच्या वीस जत्राना बंदी घातली आणि त्या ठिकाणी कोणीही जाऊन धर्म संबंधित कोणतेही कृत्य करू नये अशा पद्धतीची सक्त मनाई केल्याचे आपणास पाहावयास मिळते.[८] करवीर संस्थानात त्यावेळीची सर्वात मोठी यात्रा जोतिबाची यात्रा असायची मात्र ती यात्रा शाहू महाराजांनी रद्द केली होती.आता देखील तशाच पद्धतीने सण, उत्सव, यात्रांच्यावर बंदी घातल्याचे आपणास दिसून येते. अशा साथीच्या वेळी राज्यकर्त्यांनी जनतेची काळजी कशी घ्यावयाची याचा आदर्श शाहू महाराजांनी समोर ठेवला आहे. त्या पद्धतीनेच नियोजन करत कोरोनाला हरविणे आत्ताच्या घडीला महत्त्वाचे बनत आहे. कोल्हापूर शहरात प्लेगची लागन होऊन साथीचा फैलाव होऊ नये, लोकांनी

कोणत्या पद्धतीची दक्षता घेतली पाहिजे यासंबंधीचा दक्षतेचा जाहीरनामा त्यांनी 8 फेब्रुवारी 1899 रोजी जाहीर केल्याचे दिसून येते. या जाहीरनाम्यात रोगाचा फैलाव होऊ नये म्हणून घराची व्यवस्था कशा पद्धतीने लावावी, आपल्या चीज वस्तू कशा मोहरबंद करून ठेवाव्यात याबाबतचा विश्वास देणारा जाहीरनामा त्यांनी प्रसिद्ध केल्याचे दिसून येते. इतकेच नव्हे तर प्लेगचा प्रसार होऊ नये म्हणून लोकांनी कोल्हापूर शहर खाली करून गावाबाहेर झोपड्या बांधून राहण्याचा हुकूम शाहू महाराजांनी काढला होता. या जाहीरनाम्यात गोरगरीब व मजूर लोकांना सरकारातून मोफत झोपड्या बांधून दिल्या जातील असेही त्यांनी म्हटले होते.[९] रोजंदारी लोकास उदरनिर्वाहासाठी रोज मजुरी केली पाहिजे त्यांचे करता राहण्यास कळंबे तलावावर सरकारातून झोपड्या बांधून देण्यात येत आहेत तेथे राहून तलावाच्या कामातून त्यांनी मजुरी मिळेल अशी तजवीजही त्यावेळच्या काळात त्यांनी केली होती.[१०] या महामारीच्या रोगांमध्ये लोकांच्यावरती उपासमारीची वेळ येऊ नये त्यांच्या हातांना काम मिळावे असे हे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना वाटत होते असे दिसून येते.

प्लेगच्या साथीत लोकांना गाव सोडून माळावर राहावे लागत असे.अशा प्रसंगी लोकांचे दागदागिने, दस्तऐवज ,रोकड रक्कम इत्यादी जिंदगीचे सरकारकडून संरक्षण करण्याची व्यवस्था जाहीर करणारा जाहीरनामा 3 फेब्रुवारी 1900 रोजी छत्रपती शाहू महाराजांनी जाहीर केला आहे. [११] यातून छत्रपती शाहू महाराज लोकांच्या जीविता बरोबरच त्यांच्या संपत्तीचीही कशी काळजी घेत होते याचा आपणास वरील जाहीरनाम्यातून प्रत्यय येतो.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या या अथक प्रयत्नाचे फलित म्हणजे इतर प्रांतात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला असतानादेखील कोल्हापूर संस्थानात ही साथ वेळीच आटोक्यात आली व सर्वसामान्य जनतेचे जीवनमान हळूहळू पूर्वपदावर येऊ लागलें महाराजांनी 48 वर्षाच्या कालखंडात केलेले कार्य आजही सर्वांना प्रेरणादायी आहे

**निष्कर्ष**

कोरोनाने देशात आणि जगात जी परिस्थिती करून ठेवली तशाच पद्धतीचं संकट 1898- 99 साली कोल्हापूर संस्थानात आले होते आणि ते संकट प्लेगच्या साथीचे होते. पटापट नागरिकांचे जीव जात होते पण अशावेळी करवीर संस्थानात प्लेगचा फारसा शिरकाव झाला नाही त्याचे कारण होते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अवलंबलेले व्यवस्थापन. आज जे आपण क्वारंटाईन किंवा विलगीकरण म्हणतो त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी शाहू महाराजांनी 120 वर्षांपूर्वी केली होती. कोल्हापूर शहराला महाराजांनी जवळपास रिकामे केले होते.ग्रामीण भागातील नागरिकांना शेतात झोपड्या बांधून राहण्यास मदत करून लोकांचे प्राण त्यांनी वाचवले होते. देशातील पहिले प्लेग हॉस्पिटल याच कोल्हापुरात शाहू महाराजांच्या प्रेरणेने उभारलं होतं. प्लेग निवारण्यासाठी शाहू महाराजांनी केलेली उपायोजना आजही कोरोना काळात मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरताना दिसून येते.

**संदर्भ**


१) पी. बी. साळुंखे (संपादक) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, दुसरी आवृत्ती, 1988. पु. 23.

२) किर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पापुलर प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 1992. पा. 71.

३) डॉ. पवार जयसिंगराव (संपादित) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रथमावृत्ती, कोल्हापूर 2001. पा. 587

४) Dr. Vilas Sangave, Dr. B. D. Khane, Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Volume II, 1983,P.248.

५) कित्ता. पा. २९४.

६) कित्ता. पा. २९४.

७) कित्ता. पा. २९७.

८) कित्ता. पा. ३१०.

९) कित्ता. पा. ३६०.

१०) कित्ता. पा.३६० .

११) कित्ता. पा. ३७३.